रयत शिक्षण संस्थेचे,

# दहिवडी कॉलेज दहिवडी

## वाचन पंधरवाडा दि.१ ते १५ जानेवारी २०२५

## महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग, वाड्मय मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना

## आयोजित

# ‘वाचन संकल्प महाराष्ट्राचा ’

दि. ३ /०१/२०२५

## स्थानिक लेखक परिसंवाद

### अहवाल

दहिवडी कॉलेज येथे महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग वाङ्मय मंडळ, मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने व वाचन पंधरावडा निमित्ताने आयोजीत स्थानिक लेखक परिसंवाद संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. एस. एम. खेत्रे होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माण तालुक्यातील ख्यातनाम लेखक अजित काटकर हे उपस्थित होते.

यावेळी अजित काटकर म्हणाले,"आपल्या पुढच्या पिढीला संपत्तीपेक्षा पुस्तके द्यावीत कारण संपत्ती मिळालेली पिढी पंगु बनते, तर पुस्तके मिळालेली पिढी जगण्यासाठी सक्षम बनते. माणसाचे जीवन कोऱ्या पानाप्रमाणे असते, त्यावर आपण ज्या प्रकारची अक्षरे लिहु त्याप्रामाणे त्याची किंमत ठरत असते. चांगले व्यक्तिमत्व घडण्यासाठी चांगली पुस्तके वाचली पाहिजेत."

या कार्यक्रमाचे अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.संजय खेत्रे म्हणाले ,"सर्वांगीण विकास करायचा असेल तर थोरामोठ्यांची आत्मचरित्रे अभ्यासली पाहिजेत. विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी चारित्रसंपन्न विद्यार्थी होणं ही काळाची गरज आहे."कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. मीरा देठे यांनी केले.

सुत्रसंचालन प्रा. प्रवीण भोसले यांनी केले. आभार प्रदर्शन ग्रंथपाल प्रा. व्ही. एस. वाघेरे यांनी केले. यावेळी मराठी विभागाच्या प्रमुख डॉ. मीरा देठे, ग्रंथपाल प्रा. व्ही. एस. वाघेरे, प्रा. प्रवीण भोसले, प्रा. अनुराधा जानकर प्रा.माधवी घाडगे आदी प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रंथपाल
दहिवडी कॉलेज, दहिवडी
ता. माण, जि. सातारा.

रयत शिक्षण संस्थेचे दहिवडी कॉलेज दहिवडी

प्र. प्राचार्य
दहिवडी कॉलेज, दहिवडी
ता. माण, जि. सातारा




कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माण तालुक्यातील ख्यातनाम लेखक अजित काटकर उपस्थित होते.




GPS Map Camera
Google
Dahiwadi, Maharashtra, India
Pg3r+756, Dahiwadi, Maharashtra 415508, India
Lat 17.703004° Long 74.540314°
03/01/25 11:17 AM GMT +05:30

